Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## :: परिपत्रक ::

**विषय :** प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे परीक्षा अर्ज व अंतर्गत गुण प्रणालीमध्ये भरून विहीत मुदतीमध्ये सादर करणेबाबत...

प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे परीक्षा अर्ज भरणे, अंतर्गत गुण प्रणालीमध्ये भरणे आणि विहीत मुदतीमध्ये परीक्षा अर्ज व अंतर्गत गुण परीक्षा विभागाकडे सादर करणे हे कामकाज प्रचलित पध्दतीनुसार अधिविभागाकडून पार पाडले जाते. तथापि, सद्यपरिस्थितीमध्ये सदरची प्रक्रिया पार पाडताना उशीर होत असल्याचे पूर्वानुभवावरून दिसून येत आहे. सैध्दांतिक परीक्षेचे अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर सदरचे परीक्षा अर्ज, एकत्रित ॲप्रुव्हल लिस्टसह सत्वर परीक्षा विभागास सादर करावेत. तसेच अंतर्गत गुण सैध्दांतिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रणालीमध्ये भरून, कन्फर्मेशन झाल्यानंतर त्याची हार्डकॉपी मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक यांच्या स्वाक्षरीने परीक्षा विभागास लवकरात लवकर सादर केल्यास निकाल घोषित करण्याची कार्यवाही करण्यामध्ये सुलभता येईल.

रिसर्च ॲण्ड पब्लिकेशन इथिक्स परीक्षेचे अंतर्गत गुण प्रणालीमध्ये भरून मा. अधिविभागप्रमुख/ मा. समन्वयक यांच्या स्वाक्षरीने सदरचा रिपोर्ट पुन:श्च प्रणालीमध्ये अपलोड करावा.

यानुसार, संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्र यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे परीक्षा अर्ज व अंतर्गत गुण आणि रिसर्च पब्लिकेशन ॲण्ड इथिक्स परीक्षेचे अंतर्गत गुण योग्य ती दक्षता घेऊन संबंधित परीक्षा सुरू होण्याअगोदर परीक्षा विभागास सादर करावेत.

बीएस्सी-एमएस्सी परीक्षा विभाग/२५२
दि. ०९.१०.२०२४

डॉ. अजितसिंह जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत,
मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक, संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इंटरनेट सेल : विद्यापीठ संकेतस्थळावर Exam Circular येथे प्रकाशित करावे. (प्रसारण कालावधी - सदरचे परिपत्रक वारंवार निदर्शनास येणे अपेक्षित असल्याने दिर्घ मुदतीकरिता)